महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस अधीक्षक कार्यालय,वाशिम.
काटा रोड सिव्हील लाईन वाशिम,ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.07252-234834
ईमेल: - sp.washim@mahapolice.gov.in
Website:www.washimpolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# वाशिम पोलीसांचे धैय्य– "सायबर सेफ" वुमन

आजच्या युगात इंटरनेट हे आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला असुन दैनंदिन जीवनातले बरेच व्यवहार आज रोजी इंटरनेटच्या माध्यमातुन पार पाडले जातात जसे की, व्यवसाय,शैक्षणिक,जनसंपर्क,बॅकींग,ऑनलाईन खरेदी. इत्यादी इंटरनेट माध्यमातुन मानवी जिवन सुलभ झाले आहे. हे जितके खरे असले तरी त्याच्या वापराबाबत च्या अपु–या माहिति नेते धोक्यातही आले आहे. अशाच अपु–या माहितीमुळे सायबर गुन्हयांचे प्रमाण दिवसें दिवस वाढत आहे. यामध्ये पिडीत व्यक्ती मध्ये महीलांचे प्रमाण अधिक आहे. महीला या सॉफ्ट टारगेट असल्याने सायबर गुन्हयांमध्ये मोठया प्रमाणात पीडीत असतात.महीलां सोबत मुख्यत: घडणारे सायबर गुन्हे–

**सायबर स्टॉकिंग**:–एखाद्या व्यक्तीच्या ऑनलाईन हालचालीं चा पाठलाग करणे त्यांच्या इंटरनेट/सोशल मिडीया वरील हालचालींवर लक्ष ठेवणे व त्यांची वैयक्तीक माहीती गोळा करून त्या व्यक्तीच्या खाजगी पणाचे उल्लंघन करतात.

**मॉर्फिंग:–** यामध्ये सायबर गुन्हेगार एखाद्या व्यक्तीचे छायाचित्र त्याचे सोशल मिडीयावरील खात्यावरून मिळवतो व ते छायाचित्र मॉर्फ (ईडीट) करून परत सोशल मिडीयावर संबंधीत व्यक्तीची बदनामी करण्याच्या दृष्टीने अपलोड केले जातात.

**सायबर बुलींग** :– महीलांना सोशल मिडीया माध्यमांवर टारगेट करून विशिष्ट प्रकारच्या टिका टिपण्या केल्या जातात.

**सायबर ग्रुमिंग:–** यामध्ये अनोळखी व्यक्तीं कडुन सोशल मिडीया माध्यमांवर जवळीक साधली जाते व त्याद्वारे भेटवस्तु, प्रशंसा, मॉडेलिंग जॉब, ई.ची ऑफर देतात.

असे विविध प्रकारचे सायबर गुन्हयामध्ये महीलांना "सायबर सेफ" करण्यासाठी सायबर विभाग दखल घेते त्याच प्रमाणे केंद्र सरकार सुद्धा गंभीर असुन केंद्र सरकारचे वतीने NCCR पोर्टल तयार करण्यात आले असुन सदर पोर्टल वाशिम जिल्हयात देखील कार्यरत आहे. तसेच वाशिम जिल्हयातील सजग नागरीकांनी सदर पोर्टलचा वापर करत जानेवारी २०२१ पासुन आजपावेतो एकुण १९९ तक्रारींची नोंद केली असुन त्यापैकी एकुण १४१ तक्रारींवर कार्यवाही करण्यात येवुन त्या निकाली काढण्यात आल्या आहेत तर उर्वरीत ५८ तक्रारींवर कार्यवाही करणे सुरू आहे.

सायबर गुन्हयांध्ये सॉफ्ट टारगेट ठरत असलेल्या महीलांना "सायबर सेफ" करण्यासाठी वाशिम पोलीस अधिक्षक श्री बच्चन सिंह गंभीर असुन सोशल मिडीयावरून महीलांची बदनामी करणाऱ्या ईसमांवर पोलीस स्टेशन रिसोड तसेच पोलीस स्टेशन वाशिम शहर येथे माहीती तंत्रज्ञान अधिनियमा नुसार गुन्हे नोंदवुन आरोपींवर गंभीर कार्यवाही करण्यात आली आहे.तसेच महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमीत्या आयोजित पोलीस रेझींग डे कार्यक्रमा दरम्यान विदयार्थी व विदयार्थीनीं असे एकुण ९६५ सहभागी झालेल्या विदयार्थ्यांना सायबर गुन्हयांविषयी थोडकयात ओळख करून देण्यात आली.तसेच महीलां "सायबर सेफ" कशा राहतील व त्यांचे विरूद्धचे सायबर गुन्हयांवर कसा प्रतिबंध करता येईल याबाबत मा.पोलीस अधिक्षक सा श्री.बच्चन सिंह यांनी मार्गदर्शन केले.

ऑनलाईन फ्रॉड झाल्यास १५५२६० वर कॉल करण्याचे तसेच सायबर गुन्हयांबाबत ऑनलाईन तक्रार करण्यासाठी NCCR पोर्टल www.cybercrime.gov.in या संकेत स्थळाचा वापर करण्याचे आवाहन मा.पोलीस अधीक्षक श्री बच्चन सिंह यांनी याद्वारे केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय

Scanned with CamScanner